# प्रकरण १ ले:  पर्यटन भूगोलाची ओळख

**१.१ पर्यटन आणि पर्यटकाची व्याख्या**
**१.२ पर्यटन भूगोलाचे स्वरूप**
**१.३ पर्यटन भूगोलाची व्याप्ती**
**१.४ पर्यटनाचा ऐतिहासिक विकास**
**१.५ पर्यटन भूगोलाचे महत्व**

**प्रास्ताविक:-**

पर्यटन हा अत्याधुनिक व झपाट्याने विकसित होणारा मानवाचा **आर्थिक** व्यवसाय आहे. या व्यवसायाचा सांगोपांग विचार भूगोलशास्त्राप्रमाणे ,अर्थशास्त्र, समाजशास्त्र, पर्यावरण शास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र इत्यादी मध्ये केला जातो. पर्यटन भूगोल ही मानवी भूगोलाची उपशाखा आहे. पर्यटन भूगोल हे एक उपयोजित शास्त्र असून त्याच्या ज्ञानाचा उपयोग पर्यटनाचा विकास व समस्या सोडवण्यासाठी केला जातो. आज पर्यटनाला जगामध्ये सर्वच देशात अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले आहे.

पर्यटन हा शब्द इंग्रजीतील Tourism या शब्दाचे मराठी रूपांतर आहे. Tourism हा शब्द Tour (प्रवास) या शब्दापासून तयार झाला असून Tour हा शब्द लॅटिन भाषेतील Tornus  या शब्दापासून तयार झाला आहे. Tornus या शब्दाचे रुपांतर नंतर Tourn मध्ये झाले. Tourn याचा अर्थ Journey म्हणजेच प्रवास किंवा भ्रमंती असा होतो.

**१.१  पर्यटनाची व्याख्या** (Definition of Tourism)

पर्यटन हा मानवाचा **अर्थिक** व्यवसाय आहे. जरी या व्यवसायाची सुरुवात अगदी साध्या प्रवासापासून झाली असली तरी सध्या या व्यवसायाचे स्वरूप अत्यंत क्लिष्ट बनले असून मानवी जीवनाच्या अनेक अंगाशी आणि अनेक शास्त्राशी त्याचा निकटचा संबंध आहे. अशा परिस्थितीत या व्यवसायाची व्याख्या करणे अगदीच कठीण आहे. पर्यटनाच्या काही महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1. **जागतिक पर्यटन संस्था:-**  चोवीस तासापेक्षा अधिक व एक वर्षापेक्षा कमी काळ, घर व कामाची जागा सोडून इतर जागी राहणे, तेथील दृश्ये पाहणे आणि आनंद लुटणे म्हणजे पर्यटन होय.

२. **प्राध्यापक हुंझिकर व क्राफ (Hunziger and krapf):-** कायम स्वरूपाची वस्ती न करण्याच्या हेतूने व उत्पादनाशी संबंधित नसलेली, अपरिचित व्यक्तीच्या प्रवासातून / भ्रमंतीतून प्रस्थापित झालेली अपूर्व घटना व संबंध म्हणजे पर्यटन होय.

**३. ब्रिटनमधील पर्यटन-संस्था (1976):-** पर्यटन म्हणजे मानवाचे त्याच्या नेहमीच्या राहत्या ठिकाणापासून इतर ठिकाणी केलेले अल्पकालीन स्थलांतर होय. हे स्थलांतर संशोधन, व्यवसाय, मनोरंजन व आराम यासाठी केलेले असते.

**४. जोस ओरिलागा:-** मोटारीने किंवा सायकल वरून फिरणे, गिर्यारोहन करणे, तळ ठोकणे, नौकाविहार करणे, खेळ इत्यादीसाठी भ्रमंती किंवा प्रवास करणे म्हणजे पर्यटन होय.

**५ . ब्रिटनमधील कार्डिफ पर्यटन-संस्था (1981):-** पर्यटन म्हणजे घराबाहेर ऐछिक ठराविक काळात केलेली क्रिया होय.

**६. हॅमर:-** परदेशी माणसाचे एखाद्या देशात, प्रदेशात व शहरात, आगमन ,वास्तव्य, भ्रमंती आणि तेथून गमन म्हणजे पर्यटन होय

७. पर्यटक जेव्हा त्याने निश्चित केलेल्या ठिकाणाकडे जाण्यासाठी निघतो व तेथून तो पुन्हा त्याच्या मूळ ठिकाणी परत येतो यादरम्यान जो कालावधी जातो त्यास पर्यटन असे म्हणतात.

८. एका व्यक्तीने किंवा व्यक्ती समूहाने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मनोरंजनासाठी, अभ्यासासाठी, कामासाठी केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय.

९. पर्यटन म्हणजे दैनंदिन प्रवासाव्यतिरिक्त किंवा कामाव्यतिरिक्त केलेला प्रवास होय.

वरील व्याख्येवरून खालील गोष्टी स्पष्ट होतात

१. पर्यटनात अनिवासी लोकांचा अंतर्भाव

२. भेटी दिलेल्या प्रदेशात तात्पुरते वास्तव्य

३. कोणत्याही उत्पादनाशी निगडित नसलेली व्यक्ती

४. आनंद मिळवण्यासाठी घराबाहेर ऐछिक ठिकाणी केलेला प्रवास

५. पर्यटनात दैनंदिन प्रवासाव्यतिरिक्त केलेला प्रवासाचा अंतर्भाव

थोडकयात एकटे किंवा समूहाने, घर आणि कामाच्या जागे व्यतिरिक्त दूर राहून तेथील गोष्टींचा आनंद घेणे, तेथंपर्यंत प्रवास करणे, तेथील खाणं-पिणं-राहणं, मनोरंजन, खरेदी,

तेथील स्थानिकांशी संवाद-भेटीगाठी घेणं, तसेच यामध्ये समाविष्ट असणाऱ्या सर्व घटना, आपण केलेलं नियोजन व आपली योजना, संपर्कात येणाऱ्या संस्था व उद्योग, या सर्वांच्या एकूण सहभाग व समावेशातून आपल्याला मिळणारा अनुभव म्हणजे पर्यटन होय

**१.१ पर्यटकाची व्याख्या (Definition of Tourist)**

पर्यटन चालण्यासाठी पर्यटक हा महत्त्वाचा घटक आहे. पर्यटक हे इंग्रजीतील Tourist या शब्दाचे रुपांतर आहे. Tourist या शब्दाची निर्मिती इ.स. १२९२ मध्ये झाली. लॅटिन भाषेतील Turnus पासून Tour आणि Tourn पासून Tourist हा शब्द तयार झाला.

पर्यटकाच्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे;-

१. मराठी शब्दकोश:- आनंद उपभोगण्यासाठी प्रवास करतो तो पर्यटक होय

२.ऑक्सफोर्ड शब्दकोश:- जो उत्कंठेपायी एखाद्या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी किंवा गमतीजमती साठी किंवा मी कसा प्रवास केला हे सांगण्यासाठी भ्रमंती करतो त्यास पर्यटक असे म्हणतात

३. लीग ऑफ नेशन व संयुक्त राष्ट्र संघटना (1937) :-एखाद्या देशाला भेट देणारी व कमीत कमी 14 तास वास्तव्य करणारी व्यक्ती म्हणजे परदेशी पर्यटक होय.

४. संयुक्त राष्ट्र संघटनेना (1945):- एखाद्या देशात 24 तासापेक्षा जास्त आणि कायमस्वरूपी वस्ती न करण्याच्या हेतूने ६ महिन्यापेक्षा कमी वास्तव्य करणारी व्यक्ती म्हणजे पर्यटक होय.

थोडकयात जो करमणूक आनंद व निसर्ग सौंदर्य पाहण्यासाठी भ्रमंती किंवा प्रवास करतो तो पर्यटक होय.

**पर्यटकाची भारतातील व्याख्या:-**

भारतात स्वदेशी व परदेशी पर्यटकांच्या पुढीलप्रमाणे व्याख्या केलेल्या आहेत

**I.स्वदेशी पर्यटक**:-

भारतात पुढील व्यक्ती स्वदेशी पर्यटक समजल्या जातात

1. मंदिर, मशिद, धर्मशाळा किंवा इतर सामाजिक किंवा धार्मिक ठिकाणी मोफत आश्रय घेणारी व्यक्ती
2. एखाद्या मित्राकडे किंवा नातेवाईकाकडे 14 तासापेक्षा जास्त परंतु 15 दिवसांपेक्षा कमी वास्तव्य करणारी व्यक्ती

3. एखाद्या ठिकाणी भ्रमंतीसाठी आलेली व हॉटेल किंवा इतर ठिकाणी पैसे देऊन वास्तव्यासाठी आश्रय घेणारी कोणतीही व्यक्ती

**II) परदेशी पर्यटक:-**

रोम येथे 1963 मध्ये भरलेल्या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आंतरराष्ट्रीय पर्यटन परिषदेत पर्यटन खात्याने भारतातील पर्यटकाच्या बाबतीत पुढील व्याख्या केलेल्या केली आहे. "परदेशी पर्यटक म्हणजे परदेशी परवाने, अभ्यास, मनोरंजन, खेळ, धार्मिक गोष्टी, व्यवसाय, कुटुंब, बैठक किंवा विशिष्ट कार्यासाठी भारताला भेट देणारी व किमान २४ तास देशात वास्तव्य करणारी व्यक्ती होय".

भारतात येणारी खालील व्यक्ती परदेशी पर्यटक समजली जात नाही

१. 24 तासापेक्षा कमी वास्तव्य करणारी व्यक्ती

२. देशात वास्तव्य करण्याच्या उद्देशाने येणारी व्यक्ती

३. करार किंवा बिगर करारशिवाय एखाद्या व्यवसायासाठी अथवा पैसे कमवण्यासाठी येणारी व्यक्ती

**१.२ पर्यटन भूगोलाचे स्वरूप** (Nature of Tourism Geography)

पर्यटन व्यवसाय हा जगातील एक फार महत्त्वाचा व्यवसाय आहे. प्राचीन काळापासून मानवाला विविध प्रदेशाबद्दल आकर्षण व जिज्ञासा असल्याने या जिज्ञासेपोटी त्याने प्रवास करायला सुरुवात केली. पर्यावरणातील बदलासाठी इतर ठिकाणी जाणे, नवनवीन प्रदेशाचा शोध घेणे, आनंद प्राप्त करणे, तीर्थयात्रेला जाणे असे बदलते स्वरूप पर्यटनाचे होते. आज पर्यटनाचे स्वरूप बदलले असून पर्यटन हा एक आर्थिक व्यवसाय बनला आहे. हे जरी खरे असले तरी पर्यटनातून सेवा व रोजगार निर्मिती होते त्यामुळे तो इतर व्यवसाय पेक्षा वेगळा व वैशिष्ट्यपूर्ण असा व्यवसाय आहे. गेल्या शतकात पर्यटनाचे स्वरूप बदलले असून ते गतिमान झाले आहे.

प्राचीन कालावधीपासून आत्तापर्यंत पर्यटनाचे स्वरूप पाहिले तर ते क्रमबद्ध बदललेले दिसून येते

**1. पर्यटनाचे मनोरंजनात्मक स्वरूप:-**

अगदी सुरुवातीस पर्यटनाचे स्वरूप प्रामुख्याने आनंद मिळवणे होते या स्वरूपामध्ये पन्नास वर्षांपूर्वी एकदम बदल झाला. दुसऱ्या महायुद्धानंतर समाजातील उच्चशिक्षित पाश्चिमात्य देशातील लोक निरनिराळ्या ठिकाणचे सृष्टीसौंदर्य पाहण्याच्या निमित्ताने देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पर्यटन

स्थळांना भेटी देत असतात. अर्थात या काळात पर्यटकांची संख्या मर्यादित होती. नैसर्गिक सौंदर्याबरोबरच कला, अविष्कार व परदेशी पर्यटन स्थळांचा आनंद घेण्याचा उद्देश पर्यटनामध्ये होतो.पूर्वी केवळ श्रीमंत लोकच प्रवासाचा आनंद घेत असत. सध्या मात्र अगदी सामान्य आर्थिक परिस्थितीतील लोक सुद्धा पर्यटनाला जातात त्या प्रत्येकाच्या पर्यटनाच्या कल्पना वेगळया आहेत.

**2. पर्यटनाचे लोकशाहीकरण स्वरूप:-**

गेल्या काही दशकापासून पर्यटनाचे लोकशाहीकरण झालेले आहे.काही दिवसांपूर्वी युरोप-अमेरिकेतील हिवाळी खेळांच्या स्पर्धांचा आनंद केवळ श्रीमंत लोकांनाच लुटता येत असे सामान्य लोकांना आर्थिक दृष्ट्या या स्पर्धा परवडणाऱ्या नव्हत्या इतकेच नव्हे तर पूर्वी केवळ श्रीमंत साठी उपलब्ध होणाऱ्या नौकानयन, नेमबाजी इत्यादी स्पर्धासुद्धा सामान्य लोकांना आज उपलब्ध होत आहेत. त्यामुळे पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत आहे. त्यामुळेच पर्यटनाचे आज लोकशाहीकरण झालेले आहे.

**३.पर्यटनाचे सामाजिक स्वरूप:-**

गेल्या काही दशकापासून पर्यटनाचे लोकशाहीकरण झालेले आहे तसेच सामाजिक पर्यटन ही नवीन संकल्पना सुद्धा उदयास येत आहे. यामध्ये पर्यटन स्थळांना भेटी देण्यासाठी वाहनांची सोय, भोजन, मनोरंजन व इतर सुविधा खास सवलतीच्या कमी दरामध्ये एक गट उपलब्ध करून देतो म्हणून या पर्यटनाला सामाजिक पर्यटन म्हणतात

**४. पर्यटनाचे विविधांगी स्वरूप:-**

पर्यटनाचे स्वरूप विविध अंगी असल्याने पर्यटनाला आज उद्योगाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. पर्यटनात पर्यटक हा मुख्य घटक आहे. पर्यटक प्रवासाला निघाल्यापासून त्याचा संबंध विविध घटकांशी येतो मोटर, रेल्वे ,विमान, जहाज, निवास, पर्यटक मार्गदर्शक, पर्यटन स्थळांची यादी, पर्यटन स्थळी वस्तूची विक्री करणारे ते बाजारपेठ इत्यादी अनेक घटकांशी त्याचा संबंध येतो आणि हा संबंध बहुतांशी आर्थिक घटकांशी येतो त्यामुळे पर्यटन हा आर्थिक व्यवसाय बनला आहे. तसेच या सर्व गोष्टीमुळे पर्यटनाचे स्वरूप विविधांगी बनले आहे.

**५. पर्यटनाचे वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप**

पर्यटन हा वैशिष्ट्यपूर्ण असा व्यवसाय आहे. यात प्रवास व वास्तव्य या दोन्ही गोष्टी नेहमीच्या निवासापासून व कार्यापासून दूर असतात. यातील भ्रमंती वेगळीच असते. त्याचा आनंद अप्रतिम असतो. अशा प्रकारे पर्यटन हा व्यवसाय इतर व्यवसायापेक्षा वेगळा व वैशिष्ट्यपूर्ण आहे.

**६. पर्यटनाचे हंगामी स्वरूप**

पर्यटन हा ठराविक काळात म्हणजेच हंगामी स्वरूपाचा व्यवसाय आहे. पर्यटनाचे स्वरूप मनोरंजनात्मक असल्याने पर्यटक वर्षातील तिन्ही हंगामात पर्यटनाचा आनंद घेतात. परंतु यात होणाऱ्या हालचाली किंवा प्रवास अल्पकालीन असतात उदाहरणार्थ उन्हाळी हंगाम असल्यास थंड हवेच्या ठिकाणी, पावसाळ्यात धबधबे पाहणे, निसर्ग सौंदर्य व जंगल भ्रमणासाठी हिवाळा ऋतू निवडला जातो.

**७. पर्यटनाचे अनुउत्पादक स्वरूप:-**

पर्यटनासाठी बाहेर पडणाऱ्या पर्यटकांचा पर्यटन करतेवेळी कोणत्याही प्रकारच्या व्यवसायात किंवा उपजीविकेच्या धंद्यात समावेश नसतो. तसेच कशाचेही उत्पादन करणे हे त्यामागचा उद्देश नसतो. त्यामुळे पर्यटनाचे स्वरूप अनुउत्पादक आहे.

**८. पर्यटनाचे भौगोलिक स्वरूप:-**

पर्यटनाच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास भौगोलिक घटक पर्यटनास कारणीभूत ठरतो समुद्र, भूरूपे, बर्फ, थंड हवामान, पर्वत, पठार, मैदान, बेटे, धबधबे व नैसर्गिक वनस्पती इत्यादी पर्यटकांना आकर्षित करतात त्यामुळे पर्यटनाचे भौगोलिक स्वरूप प्राप्त झालेले दिसून येते.

**९. पर्यटनाचे ऐतिहासिक स्वरूप:-**

पर्यटक ऐतिहासिक ठिकाणांना भेटी देण्याचे पसंत करतात. विविध संग्रहालय, किल्ले, ऐतिहासिक स्मारके, वास्तू, वाडे इत्यादी ठिकाणी पर्यटक भेटी देतात त्यामुळे पर्यटनाचे ऐतिहासिक स्वरूप उदयास येत आहे.

**१०. पर्यटनाचे धार्मिक स्वरूप:-**

वेगवेगळया धर्मानुसार पर्यटक वेगवेगळया ठिकाणी आपल्या पसंतीनुसार भेटी देतात. आज धार्मिक पर्यटनाकडे पर्यटकांचा कल जास्त दिसतो. त्यामध्ये मंदिरे, मशिदी, चर्च,गिरिजा घरे इत्यादी ठिकाणी पर्यटक भेटी देतात. त्यामुळे पर्यटनाला धार्मिक स्वरूप प्राप्त झालेले आहे.

**११. आंतरविद्याशाखीय स्वरूप**

पर्यटनाचा अभ्यास अनेक विषयांमध्ये केला जात आहे. भूगोल, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, आरोग्य शास्त्रांमध्ये पर्यटनाचा अभ्यास केला जाऊ लागला आहे. त्यामुळेच पर्यटन हा कोणत्याही एका विषयाच्या चौकटीत बांधलेला विषय राहिलेला नाही. तो अनेक विद्याशाखेचा एकत्रित अभ्यास आहे त्यामुळेच पर्यटनाला आंतरविद्याशाखीय स्वरूप प्राप्त झालेले आहे.

**१२. पर्यटनाचे गतिशील स्वरूप:-**

बदलत्या काळानुसार पर्यटनाचे स्वरूप सुद्धा गतिमान होत आहे. नवनवीन पर्यटन ठिकाणांचा विकास मोठ्या प्रमाणात केला जात आहे. नवीन पर्यटन स्थळांना पायाभूत सुविधा पुरवल्या जात आहेत त्यामध्ये रस्ते, निवास व्यवस्था, सुरक्षा इत्यादी. पर्यटकांची संख्या वाढविण्यास प्रत्येक देश प्रयत्न करीत आहे. त्यामुळेच पर्यटनाचे गतिशील किंवा परिवर्तनशील स्वरूप प्राप्त झालेले दिसून येते.

अशाप्रकारे प्राचीन काळापासून आजपर्यंत पर्यटनाचे स्वरूप बदललेले दिसून येते.

**१.३ पर्यटन भूगोलाची व्याप्ती (**Scope of Tourism Geography)

प्राचीन काळात पर्यटन हे फार मर्यादित होते. मनुष्य पायी,उंट, घोडे, खेचर, हत्ती होडी याचा वापर करून एका प्रदेशातून दुस-या प्रदेशात जात असे. या प्रकारचा प्रवास हा यात्रा, नातेवाईकांना भेटणे, धार्मिक स्थळांना भेटी देणे, व्यापार करणे या हेतूने केला जात असे. साधारणपणे १७व्या शतकापर्यंत पर्यटन हे **शोधकार्य** व व्यापार यासाठीच होत होते. त्यामुळे पर्यटनाची व्याप्ती मर्यादित होती.

नंतरच्या काळात रोमन साम्राज्यात पर्यटनाची कल्पना बदलली. पर्यटन हे मनोरंजन, मौजमजा, आनंद यासाठी होऊ लागले. उत्तम दळणवळणाच्या सोयी, प्रवासाची सुरक्षितता, पर्यटकाची उत्तम निवास व्यवस्था यासारख्या सुविधामुळे रोमन साम्राज्यात पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले.

नंतर मध्ययुगीन काळात धार्मिक ठिकाणांना भेटी देण्याच्या उद्देशाने प्रवास होऊ लागला. विविध धर्माचे लोक स्मारके, यात्रा, तीर्थस्थाने इत्यादी पवित्र ठिकाणांना भेटी देऊ लागले. थोडक्यात अशा प्रकारे आनंद मिळवणे व धार्मिक उद्देशाने प्रवास करण्याच्या कल्पनेतून पर्यटनाची प्रगती झाली त्यामुळेच पर्यटनाची व्याप्ती वाढून त्याचे क्षेत्र विस्तृत झाले.

१८व्या शतकात **युरोप** मध्ये **वार्षिक सुट्टीची** कल्पना पुढे आली. यामुळे लोक सुट्टीच्या काळात विश्रांती घेण्यासाठी, मौजमजा करण्यासाठी पर्यटन करू लागले. त्यामुळेच पर्यटनाची व्याप्ती हळूहळू वाढत गेली.

१९व्या शतकाच्या अखेरीस सुरुवातीस इंग्लंड व नंतर युरोपियन देश व अमेरिकेत तांत्रिक क्षेत्रात क्रांती घडून आली. तांत्रिक क्षेत्रातील विकासामुळे वाहतूक साधनांचा विकास झाला आणि पर्यटनाला चालना मिळाली. जगात रेल्वेचा शोध लागला जगातील पहिली रेल्वे इंग्लंडमध्ये इ.स. १८३० मध्ये लिव्हरपूल ते मॅंचेस्टर यादरम्यान धावू लागली. भारतात पहिली रेल्वे 16 एप्रिल 1853 रोजी बोरीबंदर ते ठाणे अशी ३० किलोमीटर अंतराची रेल्वे वाहतूक सुरू झाली. या रेल्वे वाहतुकीमुळे पर्यटन फार स्वस्त झाले व पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणामध्ये वाढली.

१९व्या शतकात रेल्वेप्रमाणेच सागरी वाहतूक क्षेत्रात ही लक्षणीय प्रगती झाली व सागरी मार्गाचा विकास झाल्यामुळे औद्योगिक क्रांती घडून आली. यामुळेच नोकरदारांचा नवीन वर्ग तयार झाला तसेच श्रीमंता प्रमाणेच मध्यमवर्गीय कामगार पर्यटनाला पसंती देऊ लागले त्यामुळेच पर्यटनाची व्याप्ती वाढत गेली.

२०व्या शतकाच्या पूर्वार्धात जगात रस्ते मार्गाचा विकास झाल्याने मोटारी धावू लागल्या. त्यामुळेच पर्यटनाच्या क्षेत्रात २०व्या शतकाच्या उत्तरार्धात प्रचंड बदल झाले. दुसऱ्या महायुद्धानंतर झालेल्या हवाई वाहतुकीच्या विकासाने पर्यटन विकासात मोठी भर घातली. हवाई वाहतुकीमुळेच आंतरराष्ट्रीय पर्यटनाला गती मिळाली. हवाई वाहतूकमुळेच काही वेळेत आंतरराष्ट्रीय पर्यटन ठिकाणी भेटी देणे शक्य झाले. हवाई वाहतूकमुळे पर्यटनाची व्याप्ती इतकी वाढली की त्याचे क्षेत्र हे विशाल बनले आहे.

आज पर्यटन व्यवसाय सर्वसामावेशक बनला आहे. त्यामुळे पर्यटनाची व्याप्ती फार मोठी व व्यापक झाली आहे. पर्यटन एका व्यक्ती पुरते मर्यादित नसते ते समूहाशी संबंधित असते. त्यामध्ये वाहतूक एजंट, पर्यटकांचा प्रवासाची साधनं, वास्तव्याचे ठिकाण, हॉटेल, भोजनालय, इतर कर्मचाऱ्यांची येणारा संबंध, पर्यटन स्थळ, वस्तू खरेदी करताना तेथील दुकानदाराशी येणारा संबंध, खर्च केलेले पैसे, इतिहासातील सर्व घटकांचा समावेश पर्यटनात होतो. अलीकडे पर्यटनात भौगोलिक घटकाचे महत्त्व, पर्यटनाचे विविध प्रकार, पर्यटन नियोजन, निरनिराळ्या देशातील पर्यटन केंद्रे, पर्यटनाचा आर्थिक व सामाजिक

जीवनावर होणारा परिणाम, हे सर्व पर्यटन भूगोलाचे प्रमुख विषय बनले आहेत. अशाप्रकारे पर्यटन भूगोलाच्या व्याप्तीमध्ये अमुलाग्र बदल झाल्यामुळे पर्यटनाचे क्षेत्र विशाल बनले आहे.

**१.४ पर्यटनाचा ऐतिहासिक विकास (**Historical development of Tourism)

ऐतिहासिक वस्तू किंवा वास्तू हा पर्यटनातील असा महत्त्वाचा घटक आहे की त्या घटकाने आजवरच्या पर्यटन विकासावर प्रभाव टाकलेला आहे. विविध प्रदेश, प्रांत व देशातील वेगवेगळया काळातील ऐतिहासिक वास्तू, पर्यटकांचे आकर्षण ठरलेले आहेत. जगाच्या कानाकोपऱ्यात अशी असंख्य ऐतिहासिक स्थळे आहेत की त्या पर्यटनामध्ये तिथला जिवंत इतिहासाचा अनुभव घ्यावा हा पर्यटकाचा उद्देश असतो. ऐतिहासिक पर्यटनामध्ये प्रामुख्याने खालील प्रकारांचा समावेश होतो.

**१. प्राचीन कलाविष्कार**

प्राचीन कलाविष्कार जगाच्या इतिहासात अनेक देशात पाहावयास मिळतात व हे कलाविष्कार पर्यटकांचे प्रमुख आकर्षण आहेत. प्राचीन रोमन साम्राज्यातील पिरामिड हे जगातील पर्यटकांचे आकर्षण आहे. भारतातील प्राचीन कला अविष्काराचा विचार केल्यास प्राचीन संस्कृतीचे कलाविष्कार हे एक समृद्ध अंग होते. भारतीय कलाविष्कार भारतीय संस्कृतीचा मानबिंदू आहे. भारतातील विविध राज्यातील बौद्ध, जैन, हिंदू, धर्माची मंदिरे, लेण्या, विहार हे या कलाविष्काराचे माध्यम आहे. अजिंठा,वेरूळ, कार्ले,भाजे, पितळखोरे, घारापुरी, बांधा, बदामी, बारावर, उदयगिरी इत्यादी ठिकाणच्या लेण्या जगप्रसिद्ध आहेत. तर सांची, अमरावती, नागार्जुन कोंडा इत्यादी ठिकाणचे स्तूप ही प्रसिद्ध आहेत. भारताला मंदिराचा देश म्हणून ओळखले जाते सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकुट, पल्लव, चोल ,शिलाहार, यादव आधी कालखंडातील गुप्त शैली, चालुक्य शैली, प्रतीहार शैली, नागर शैली, द्रविड शैलीचे असंख्य मंदिरे,पट्टदकल, वातापि, बदामी, कांचीपुरम, मदुराई, तंजावर, कोणार्क, महाबलीपुरम, कोल्हापुर, ज्योतिबा इत्यादी असंख्य मंदिरावरील कलाविष्कार पाहण्यासाठी पर्यटक येतात. उत्तर भारतातील मार्तंड मंदिर, खजुराहो मंदिर, 64 योगिनी मंदिर, दिलवाडा मंदिर ,कोणार्क मंदिर, जगन्नाथ पुरी चे मंदिर भारतीय कला अविष्काराचा अचूक नमुना आहे. याठिकाणी प्रतिवर्षी लाखो पर्यटक भेट देतात.

**२. पुरातत्त्वीय स्थळे**

भारताला संपन्न प्राचीन वारसा लाभलेला आहे. जगातील अतिप्राचीन ग्रीक,रोमन केसोपिरीयन एक सिंधू संस्कृती आहे. या सिंधू संस्कृतीच्या काळातील अनेक पुरातत्त्वीय स्थळे आज भारतात

अस्तित्वात आहेत. भारतामध्ये सर्वप्रथम 1922 मध्ये राखल दास बॅनर्जी यांनी पंजाब येथे हडप्पा व सिंधू प्रांतात दयाराम सहानी यांनी मोहोजदाडो या प्राचीन नगराचा शोध लावला. या सिंधू संस्कृतीच्या पाऊलखुणा पंजाब, राजस्थान, काठेवाड, मध्यप्रदेश येथे पहावयास मिळतात. यामध्ये कालीबंगन, नावडाटोळी, रंगपूर, दायमाबाद, सूरकोरडा, अमरी इत्यादी ठिकाणी पुरातत्वीय अवशेष सापडलेले आहेत. त्या ठिकाणी दरवर्षी हजारो पर्यटक भेट देतात. याशिवाय नेवासा, तअशीला, नागार्जुनकोंडा, तक्षशिला ही महत्त्वाची पुरातत्त्वीय पर्यटन स्थळे आहेत.

**३.ऐतिहासिक वास्तू व स्थापत्य**

जागतिक इतिहासाची साक्ष म्हणून आजही अनेक वास्तू व स्थापत्य त्या त्या काळाचा जीवन इतिहास म्हणून उभ्या आहे. या वास्तू एक तर ज्या ठिकाणी निर्माण केल्या तेथे किंवा विविध संग्रहालयात पाहावयास मिळतात. इटलीची राजधानी रोम, फ्रान्सची राजधानी पॅरिस, इंग्लंडची राजधानी लंडन हे तेथील ऐतिहासिक वास्तू व स्थापत्यामुळे जगप्रसिद्ध आहेत. भारतात ही अशी शेकडो स्थळे ऐतिहासिक वास्तू स्थापत्यासाठी प्रसिद्ध आहेत. आग्रा, फत्तेपूर शिक्री, जयपूर, जोधपूर, कोल्हापूर, औरंगाबाद, हैदराबाद, बदामी,हम्पी, दिल्ली इत्यादी ऐतिहासिक वास्तू जगप्रसिद्ध आहेत. भारतातील विविध प्रांतात विविध काळात अनेक राजवटी सत्तेवर आल्या व गेल्या त्यांनी आपापल्या काळात विशिष्ट वास्तू व स्थापत्याची निर्मिती केलेली आहे. महाराष्ट्रातील डोंगरी किल्ले व जलदुर्ग हे तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्थापत्याचा उत्कृष्ट उदाहरण आहेत. विविध किल्ले, राजवाडे, वाडे इत्यादी ऐतिहासिक वास्तू आज पर्यटनाचे आकर्षण आहेत. जगातील बहुतांश पर्यटक ऐतिहासिक वास्तू पाहण्यासाठीच बाहेर पडतात.

भारतातील ऐतिहासिक पर्यटन स्थळाचे संवर्धन आणि विकास भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागामार्फत (Archaeological Survey of India) केले जाते. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाचे प्रमुख कार्य राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाच्या प्राचीन स्मारकाचे तसेच पुरातत्वीय स्थळाचे आणि अवशेषांचे संवर्धन करणे हे आहे. त्या दृष्टिकोनातून ऐतिहासिक घटकांचे संवर्धन व विकास करण्यासाठी भारतामध्ये पुरातत्व विभागाअंतर्गत महासंचालक नेमण्यात येतो. सध्याचे भारतीय पुरातत्व विभागाचे महासंचालिका म्हणून उषा शर्मा हे काम पाहतात. भारतात गड-किल्ल्यांचे संवर्धन करण्याचा प्रयत्न केला जातो, तेव्हा तेव्हा तो काही अपवाद वगळता तडीस जात नाही असा आज पर्यंतचा अनुभव आहे. बरेच गड हे पुरात्तव विभागाच्या (Archaeological Survey of India - ASI) अखत्यारीत येत असल्याकारणाने ASI च्या गतीने आणि नियमांच्या चौकटीनुसार हे काम सुरु राहतं. जसा निधी मिळेल तसं जतन करायचं काम पूर्ण केलं जातं. शिवाय,

ASI च्या कामामध्ये काहीच हस्तक्षेप करू शकत नाही. त्यामुळे सर्व ऐतिहासिक घटकाचे संवर्धन आणि जतन करण्याचे काम भावी पिढीतील लोकांवरती आहे. आज ऐतिहासिक पर्यटन स्थळाचे संवर्धन करणे फार महत्त्वाचे आहे. भविष्यामध्ये आपल्या भावी पिढीस हा इतिहास समजावा म्हणून ऐतिहासिक पर्यटनाचा विकास करणे गरजेचे आहे.

**१.५ पर्यटन भूगोलाचे महत्व (**Significance of Tourism Geography)

पर्यटन हा आधुनिक व अत्यंत झपाट्याने वाढणारा सेवा उद्योग म्हणून समोर येत आहे. पर्यटन आणि भूगोल यांचा जवळचा संबंध आहे. भौगोलिक घटका शिवाय पर्यटन अशक्य आहे. मानवाला भौगोलिक घटकाचे आकर्षण असल्यामुळे पर्यटन हा एक मानवाचा आर्थिक व्यवसाय बनत आहे. पर्यटन हे भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, धार्मिक घटकावर अवलंबून आहे. त्यामधील भौगोलिक घटक पर्यटनाच्या अनुषंगाने सर्वात महत्वाचा आहे. ज्या प्रदेशांमध्ये भौगोलिक घटकांमध्ये विविधता आहे अशा ठिकाणी पर्यटनाचा जास्त विकास झालेला दिसून येतो म्हणूनच पर्यटन भूगोलाचे अध्ययन महत्त्वाचे आहे.

पर्यटनाचा बराच विकास हा भौगोलिक घटकावर अवलंबून असतो त्यामध्ये पर्वत, पठार, मैदान, घळई, धबधबे, नद्या, समुद्रकिनारे, बेटे ,शिखरे, बर्फाच्छादित प्रदेश, जंगले, गवताळ प्रदेश, चांगले हवामान असलेल्या प्रदेशांमध्ये पर्यटक जास्त आकर्षित होतात. वरील सर्व घटक भूगोलाशी संबंधित आहेत म्हणून पर्यटनाचा विकास करण्याच्या दृष्टीने पर्यटन भूगोलाचा अभ्यास सर्वात महत्त्वाचा आहे.

पर्यटनामुळे देशी-विदेशी पर्यटक पर्यटन स्थळाला भेट देतात त्यामुळेच एखाद्या देशाची अर्थव्यवस्था मजबूत होते, त्या प्रदेशांमध्ये रोजगार उपलब्धता होते तेथील सेवा उद्योगाचा विकास होतो असे अनेक परिणाम त्या पर्यटन स्थळाच्या ठिकाणी दिसून येतात. त्या पर्यटन स्थळाच्या ठिकाणी पायाभूत सुविधा देत असताना, त्याचबरोबर पर्यटनाचे नियोजन करताना, रस्ते, हॉटेल्स, विश्रामगृहे, बाजारपेठा स्थापन करताना भूगोलाचा अभ्यास करावा लागतो.

एखाद्या पर्यटन स्थळाला प्रसिद्धी देण्यासाठी फार मोठ्या जाहिराती कराव्या लागतात. पर्यटन स्थळाचे नकाशे वापरून पर्यटन स्थळाची जाहिरात केली जाते त्यामुळेच पर्यटन व भूगोल यांचे अतूट नाते दिसून येते.

वरील पर्यटन भूगोलाचे सर्व प्रकारचे महत्त्व लक्षात घेता विद्यार्थी,शिक्षक, भूगोल संशोधक, भूगोल शास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, नियोजनकार या सर्वांच्या दृष्टीने पर्यटन भूगोलाचे अध्ययन महत्त्वाचे आहे.

**१.५.१ पर्यटनाचे महत्व** (Significance of Tourism)

जगातील बहुतेक देश पर्यटन विकासासाठी प्रयत्न करत आहेत. पर्यटनामुळे देशाची आर्थिक प्रगती होते. पर्यटन व्यवसायाचे आर्थिक, सामाजिक व राजकीय दृष्टीने महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल

**१.परकीय चलनामध्ये वाढ**

पर्यटनामुळे आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या देशांना मोठ्या प्रमाणावर परकीय चलन उपलब्ध होते उदा. नेपाळ या देशाला परकीय चलन केवळ पर्यटनामुळे उपलब्ध होते.

**२.रोजगार उपलब्ध होतो**

पर्यटन मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देतो. पर्यटकांची निवास व भोजन व्यवस्था, मार्गदर्शन, मनोरंजन, वाहतूक इत्यादी क्षेत्रात हा रोजगार उपलब्ध होतो. यामध्ये कुशल मजूरा बरोबरच अर्धकुशल व अकुशल लोकांनाही रोजगार उपलब्ध होतो.

**३.राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते**

पर्यटनामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष करामुळे मोठ्या प्रमाणात भर पडते

**४.सेवा उद्योगांचा विकास**

पर्यटन व्यवसायामुळे सेवा उद्योगाचा विकास होतो. एखाद्या पर्यटन केंद्राजवळ सेवा देणाऱ्या अनेक उद्योगाचा विकास झालेला दिसून येतो. उदा. ट्रॅव्हल एजन्सी, मार्गदर्शक, टॅक्सीचालक, हॉटेल इत्यादी

**५.हस्तकला व्यवसायाचा विकास**

पर्यटनामुळे हस्तकला व्यवसायाच्या विकासाला चालना मिळते. उदा. गोव्यात मिळणाऱ्या शंख-शिंपले याच्या माळा व इतर वस्तू, जम्मू-काश्मीरमधील शाली व गालिचे तयार करणाऱ्या व्यवसायाचा विकास तेथील पर्यटनामुळे झालेला आहे.

**६.व्यापाराची प्रगती होते**

पर्यटनामुळे व्यापाराची प्रगती होते. येणारे पर्यटक तेथील वस्तूची खरेदी करतात त्यामुळे पर्यटन केंद्राच्या जवळील व्यापारामध्ये वाढ झालेली दिसून येते.

**७. सामाजिक ऐक्य निर्माण होते**

पर्यटनामुळे वेगवेगळ्या प्रदेशातील लोकांच्या विचारांची देवाण-घेवाण होते. तसेच विविध चालीरीती, परंपरा, संस्कृती इत्यादीची माहिती होते. त्यामुळे दोन देशातील लोकांची मैत्री होऊन एक प्रकारे सामाजिक ऐक्य निर्माण होण्यास मदत होते.

**८.जागतिक सामंजस्य वाढवण्यास मदत होते**

पर्यटनामुळे विविध देशातील लोक एका देशातून दुसऱ्या देशात जातात त्यांच्या आचार विचारांची देवाण-घेवाण होते. दोन देशातील संबंध सुधारण्यासाठी पर्यटन हा चांगला व्यवसाय आहे. पर्यटनामुळे जागतिक सामंजस्य वाढण्यास मदत होते.

**९.प्रादेशिक असमतोल कमी करण्यास मदत होते**

प्रादेशिक असमतोल कमी करण्याचे एक उपयुक्त साधन म्हणजे पर्यटन होय. भारतासारख्या देशात जम्मू काश्मीर, गोवा या मर्यादित साधनसंपत्ती असलेल्या राज्यात पर्यटनामुळे विकास शक्य झालेला आहे. त्यामुळेच भारतात प्रादेशिक असमतोल कमी करण्याच्या दृष्टीकोनातून पर्यटन व्यवसायाला चालना दिली गेलेली आहे.

**१०.बेकारी कमी करण्यास मदत होते**

पर्यटनाचा विकास करून रोजगार निर्मिती करून थोड्याफार प्रमाणात बेकारी कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यासाठी पर्यटन केंद्राचा विकास करण्यासाठी अनुदान देऊन पर्यटन केंद्राचा विकास केला जात आहे.

अशाप्रकारे पर्यटन व्यवसाय हा एक आर्थिक व्यवसाय बनलेला आहे. एखाद्या पर्यटन केंद्राचा विकास झाला तर त्या पर्यटन केंद्राच्या जवळील प्रदेशाचा विकास झालेला दिसून येतो. त्यामुळेच पर्यटनाचा विकास हाच रोजगार निर्मितीचा एक अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. त्यामुळेच पर्यटनाला जास्त महत्त्व प्राप्त झालेले दिसून येते.

## स्वाध्याय

**खालील प्रश्नासाठी योग्य पर्याय निवडा**

१.अलीकडे पर्यटनाचे स्वरूप कसे बनले आहे?

अ)गतिशील ब)पारंपारिक क)वर्णनात्मक ड)चित्रात्मक

२.पर्यटन हा कोणत्या प्रकारचा व्यवसाय आहे

अ) आर्थिक ब) सामाजिक क) राजकीय ड) सांस्कृतिक

३.कोणत्या वाहतूक सुविधांमुळे आंतरराष्ट्रीय पर्यटनात वाढ झाली

अ) रेल्वे ब) हवाई क) रस्ते ड) जलवाहतूक

४.अठराव्या शतकात कोणत्या देशाने वार्षिक सुट्टीची कल्पना सुरू केली

अ) आशिया ब) अमेरिका क) युरोप ड) आफ्रिका

५.आनंद उपभोगण्यासाठी कोण प्रवास करतो

अ) विद्यार्थी ब) पर्यटक क) शास्त्रज्ञ ड) व्यापारी

६.पर्यटनात लोकांच्या हालचाली कशा होत असतात

अ) दीर्घ कालावधीसाठी ब) अल्प कालावधीसाठी क) कायमस्वरूपी ड) वर्षासाठी

७.सर्वसाधारणपणे १७ व्या शतकापर्यंत पर्यटन कशासाठी केले जात होते

अ) पैसा मिळवणे ब) यात्रा क) धार्मिक ड) शोधकार्य

८. अलीकडे पर्यटन कसा विषय बनला आहे

अ) आंतरविद्याशाखीय ब) शास्त्रीय क) परस्परविरोधी ड) बहुपर्यायी

९.पर्यटनामुळे कोणत्या वस्तू बनवणाऱ्या लघु उद्योगाच्या विकासास चालना मिळते

अ) अवजड ब) हस्त कलात्मक क) औषधी ड) बिगर कलाकुसरीच्या

**खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा**

१.पर्यटनाचे स्वरूप स्पष्ट करा

२.पर्यटनाची व्याप्ती सांगा

३. पर्यटनाचे महत्त्व स्पष्ट करा

४.पर्यटनाचा ऐतिहासिक विकास सांगा

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा**

१.पर्यटन म्हणजे काय सांगून त्याचे पर्यटनाचे स्वरूप स्पष्ट करा

२.पर्यटनाची व्याख्या सांगून पर्यटनाचे महत्त्व सांगा